**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर-७२२/२०२२**

**अपिलार्थी, श्री.कमलाकर भागोजी फटकरे**
**ए/००३, भास्कर कॉम्पलेक्स,**
**ए.बी.सी.को.ऑ.हौ.सो.लि., विजय नगर**
**नालासोपार पूर्व, ता.वसई, जि.पालघर ४०१ २०९**

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
राज्य उत्पादन शुल्क पालघर यांचे कार्यालय
फ्लॅट नं.११, आदर्श नगर, साई सर्व्हीसच्या मागे
मनोर माहिती रोड, ता.जि.पालघर ४०१ ४०४

प्रथम अपीलीय प्राधिकारी,
राज्य उत्पादन शुल्क पालघर यांचे कार्यालय
फ्लॅट नं.११, आदर्श नगर, साई सर्व्हीसच्या मागे
मनोर माहिती रोड, ता.जि.पालघर ४०१ ४०४

**व्दितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.५.२०२४**

| **माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक** | **जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक** | **प्रथम अपिल आदेश दिनांक** |
|---|---|---|---|
| **२०.८.२०२१** | ------ | **२९.९.२०२१** | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२.३.२०२२ रोजीच्या अर्जान्वये " १ महिना पूर्ण होऊनसुध्दा मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर व्दितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर व्दितीय अपिलावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. बी. एल. भूतकर, उप-अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क पालघर हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" (*रिजेन्सी फॅमिली रेस्टॉरंट बार ची परवानगी घेण्यासाठी अर्जासोबत दाखल करण्यात आलेल्या संपूर्ण कागदपत्रांची दुय्यम प्रत मिळण्याबाबत व इतर माहिती.*) "

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "१ महिना पूर्ण होऊनसुध्दा माहिती मिळाली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविण्यात आली नाही. तसेच प्रथम अपिलिय अधिकारी यांनीही प्रथम अपिलावर सुनावणी घेतली नाही व आदेश पारित केले नाहीत.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे कथन केले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी या प्रकरणी काय निर्णय घेतला याबाबतची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. मात्र, आता ते अपिलार्थींना संपूर्ण माहिती उपलब्ध करून देण्यास तयार आहेत. तशी माहिती त्यांनी आज सोबत आणली असून ती अपिलार्थी यांना आजरोजी आयोगासमोर देण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आल्यामुळे, अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मे, २०२४

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

संगणक-१०